# ॥ हरि ॐ ॥

# ॥ श्रीमंगलचण्डिकाप्रपत्ती ॥

साहित्यः– चौरंग,मोठी परात,कलश,ताम्हण, त्रिविक्रमाचा फोटो,गहु,तांदुळ,हळद,कुंकु

दरवर्षी संक्रांतीच्या दिवशी सूर्यास्तानंतर जास्तीत जास्त स्त्रियांनी एकत्र येऊन घराबाहेर मोकळ्या जागी एका चौरंगावर एक मोठी परात घ्यावी,परातीत गहू,त्यावर कलश,त्याच्यामध्ये तांदूळ,कलशावर ताम्हण व ताम्हणांत देवीची दोन पाऊलं उजवं पाऊल कुंकवाच,डाव पाऊल हळदीचं काढावे.परातीमध्ये कलशाला टेकून त्रिविक्रमाचा फोटो ठेवायचा.हातांत एक तबक घेऊन त्यांत खालील प्रपत्तीपूजाद्रव्ये घ्यावीत.

१)शेवग्याच्या शेंगा
२)केळी
३)काकडी किंवा दूधी
४)श्रीफळ(नारळ)
५)गाजर
६)मुळा किंवा तोंडली
७)उडदाची डाळ
८)तिळाचे तेल
९)दही
१०)हळद(पावडर)
११)आलं
१२)गूळ
१३)चिंच
१४)ऊसाचे कांडे
१५)सुगंधी फुले
१६)अक्षता
१७)अभिचारनाशक पुरचुंडी (यांत विड्याच्या पानांत मीठ,मोहरी.व कापूर घालून त्या पानाला दोरीने बांधायचं म्हणजे पुरचुंडी तयार)

श्री महिषासुरमर्दिनीची
माते गायत्री, सिंहारूढ भगवती–महिषासुरमर्दिनी, क्षमस्व चण्डिके ।
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥
प्रतिपदा,घोररुप महाकाली–असुरों को भयकारी,रक्ष चण्डिके ॥२॥ धृ ॥
द्वितीया,कनकांगी महालक्ष्मी–सर्वविघ्ननाशिनी,रक्ष चण्डिके ॥३॥ धृ ॥
तृतीया,महासरस्वती राज्ञी–सर्वरोगनाशिनी,रक्ष चण्डिके ॥४॥ धृ ॥
चतुर्थी,रक्तदन्तिका योगिनी–असुररक्तप्राशिनी,रक्ष चण्डिके ॥५॥ धृ ॥
पंचमी,नीलवर्ण शताक्षी–अन्नजलदायिनी,रक्ष चण्डिके ॥६॥ धृ ॥
षष्ठीते,श्रीरामवरदायिनी–अशुभनाशिनी,रक्ष चण्डिके ॥७॥ धृ ॥
सप्तमी,नन्दिनी गर्भदायिनी–श्रीकृष्णतारिणी,रक्ष चण्डिके ॥८॥ धृ ॥
अष्टमी,दत्तमंगला चण्डिका–श्रीगुरुभक्तिरुपा,रक्ष चण्डिके ॥९॥ धृ ॥
नवमी,नित्या मन्त्रमालिनी–कलिमलहारिणी,रक्ष चण्डिके ॥१०॥ धृ ॥
कृपा करो,अशुभ हरो–हे वज्रमंडलराज्ञी,रक्ष चण्डिके ॥११॥ धृ ॥

त्यानंतर ह्या सर्व स्त्रीयांत वयाने जी मोठी असेल,तीने श्री महिषारुरमर्दिनीची आरती करायची व बाकीच्यानी आरती म्हणायची.

आरती झाल्यावर प्रत्येक स्रीने क्रमाक्रमाने चण्डिकेच्या पदचिन्हस्थानास अर्थात कतरज आश्रमास फेर धरल्याप्रमाणॆ नऊ प्रदक्षणा करायच्या.प्रदक्षणा करताना श्रीगुरुक्षेत्रमंत्र मोव्याने म्हणायचा.प्रदक्षणा पूर्ण झाल्यावर पुरचुंडीने त्रिविक्रमाची दृष्ट काढायची आणि त्याला सांगायचं की बाबारे माझ्या घरवर असणारी कुठलीही कुदृष्टी,कुबुध्दी,कुकर्म ह्या सगळ्यांचा तू तुझ्या आईच्या सहाय्याने नाश कर.व ती पुरचुंडी होमकुंडांत कापूर व काव्यांच्या सहाय्याने तेजोवलयम् अग्नी निर्माण करून त्यांत अर्पण करावी.

त्यानंतर ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे हा मंत्र नऊ वेळा म्हणत सर्व स्रियानी त्या पावलांवर अक्षता वहाव्यात व त्रिविक्रमास सुगंधी फुले अर्पण करावीत.

नंतर तिथे जमलेल्या सर्व स्रियानी त्या पावलांतील हळद–कुंकु घरी न नेता स्वत:च्या कपाळाला किंवा गळ्याला तिथल्या तिथेच लावावे.

प्रपत्तीपूजाद्रव्यातील आणलेल्या स्वत:च्या कॆळी स्वत: खायच्या.

दही घरी नेऊन घरातील पुरुषाना प्रसाद म्हणुन द्यावे,(दही स्रियानी खाऊ नये)

ऊस स्रियानी घरी नेऊन स्वत: खावा व इतर स्रियानाही द्यावा त्या दिवशी थोडातरी खावा.

केळी,दही,ऊस व सुगंधी फुले सोडून उरलेल्या प्रपत्तीपूजाद्रव्यांचे सांबर बनवून ते त्याच रात्री घरातील स्रिया व पुरुषानी पोळी आणि भाताबरोबर खावे.(त्या दिवशी इतर कुठलीही भाजी करू नये)

शेवटी तेजोवलयम् अग्नीस कडुलिंबाच्या पाल्याने शांत करावे

## श्रीमंगलचण्डिकाप्रपत्ती स्रियाना यशस्वी सैनिक बनविते

ह्या चण्डिकेची पांच अंग आहेत

१)चण्डिका महिषासुरमर्दिनी ही परमात्म्याची माता आहे आणि त्यामुळे हा परमात्मा सदैव तिला शरण असतो आणि म्हणुनच मलाही तिला शरण जाणे अत्यावश्यक आहे.
२)चण्डिका महिषासुरमर्दिनी ही स्वत: व आपल्या लाडक्या पुत्राकरवी माझं रक्षण करीलच असा विश्वास बाळगणे व व्यक्त करणे.
३)चण्डिका महिषासुरमर्दिनीच्या पुत्राचा (परमात्मा,महाविष्णु,परमशिव,राम,कृष्ण,साई)आश्रय पत्करणे त्याचे नित्यस्मरण करणे त्याच्या आज्ञेत राहणे तोच माझा आधार आहे ह्या निष्ठेने जगणे
४)चण्डिका महिषासुरमर्दिनीने आपल्याला जवळ घेऊन परमात्म्याच्या हाती सोपविणे म्हणुन प्रार्थना करायची
५)चण्डिका महिषासुरमर्दिनीच्या कृपेने अधिकाधीक भक्ती संपादन करुन प्रपंच व अध्यात्म यशस्वी होण्यासाठी, सुफ्ल संपूर्ण होण्यासाठी तीला शरण जाणे.
संक्रांतीच्या  दिवशी माता चण्डिका महिषासुरमर्दिनीने पृथ्वीवर पहीले पाऊल ऋषि कर्दम व देवहूति ह्यांच्या कतराज आश्रमांत पहिले पाऊल ठेवले.
सूर्यास्तानंतर कारण दिवसा उजेडी तिचं तेज लोकाना सहन झालं नसतं

ही श्रीमंगलचण्डिकाप्रपत्ती  केल्याने स्री कोणत्याही भूमिकेत असली तरी ती तिच्या संपूर्ण घराची रक्षण करती बनते.
ही श्रीमंगलचण्डिकाप्रपत्ती साजरी केली जाणारी जागा व मांडणावळ म्हणजे कतराज आश्रम स्थानाचे प्रतीकरुप
स्रियांचा मासिक धर्म असेल तर त्यानी त्या वेळी जिभेला व नाभीला उदी लावावी.
पूजेसाठी स्रियानी स्नान करुन येणे आवश्यक आहे..
अभिचार म्हणजे कुठलीही कुदृष्टी,कुबुद्धी,कुकर्म
गुरुक्षेत्रमंत्रामुळे होमातील अग्नीचे रुपांतर तेजोवलयम् होते व ह्या तेजोवलयम् अभिचार नाश पाऊन तुमच्या घराचं कल्याण होते.
पूजाद्रव्यातील केळी सर्व स्रियानी स्वत: तिथल्या तिथेच खायची आहेत घरी राहणाऱ्या स्रियाना न्यायची नाहीत
ताम्हणांत काढलेल्या पदचिन्हांचे हळाद–कुंकु तिथल्या तिथेच लावायचे आहेत घरी राहणाऱ्या स्रियाना न्यायचे नाही.
चवीसाठी सांबर मध्ये आवडी नुसार मसाले वापरयला हरकत नाही.